


# उघडा स्वर्ग

"... आकाश दुभागून मला दिव्य दृष्टान्त दिसले ..." यहेज्केल 1:1

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Open Heavens)

# उघडा स्वर्ग

"... आकाश दुभागून मला दिव्य दृष्टान्त दिसले ..." यहेज्केल 1:1

# अनुक्रमणिका

परिचय

1. जसे स्वर्गात तसेच पृथ्वीवरही 1

2. उघडा स्वर्ग म्हणजे काय? 4

3. स्वर्ग कशामुळे उघडला जातो? 12

4. तुमच्या प्रदेशावर स्वर्ग उघडा आहे का? 20

# परिचय

लोक, समुदाय आणि भौगोलिक प्रदेशांवर स्वर्ग उघडल्याबद्दल ख्रिस्ताच्या मंडळीस नवीन समज आणि अंतर्दृष्टी प्राप्त होत आहे.

असे दिसते की जगात असे काही प्रदेश आहेत जे उघडलेल्या स्वर्गासाठी "संवेदनशील ठिकाणे" आहेत. खरे म्हणता अशा प्रदेशांमध्ये "स्वर्ग खाली आणणे" सोपे आहे. उदाहरणार्थ, वेल्सने 1859 मध्ये देवाचे संजीवन पाहिले आणि त्यानंतर 1904 मध्ये दुसरे संजीवन उसळले. फ्लोरिडा प्रदेशाने पेन्साकोला येथे आत्म्याची वृष्टी पाहिली, ज्याला 1995 चे ब्राउन्सविल संजीवन देखील म्हटले जाते आणि अगदी अलीकडे, 2008 मध्ये लेकलँड येथे पवित्र आत्म्याची वृष्टी करण्यात आली.

म्हणून, ज्या प्रदेशात पूर्वी संजीवन, आत्म्याची वृष्टी आणि परमेश्वराच्या भेटी पाहिल्या आहेत तेथे स्वर्ग सहज उघडेल अशी अपेक्षा करण्यास प्रोत्साहित केले जाते. 1906 मध्ये जेव्हा वेल्श मिशनरी संजीवनाचा अग्नी घेऊन आले तेव्हा भारतातील शिलाँगला मोठे संजीवन प्राप्त झाले. 2000 च्या सुरुवातीस, शिलॉन्गमधील विश्वासणारे दुसऱ्या संजीवनासाठी देवाचा धावा करू लागले. 2006 च्या शिलाँग संजीवनात त्यांच्या मनापासून केलेल्या प्रार्थनेने पुन्हा एकदा आकाश उघडले. पंजाबमधील सियालकोटने 1904 मध्ये एक महान संजीवनाचा अनुभव घेतला. जेथे जॉन हाइड नावाच्या माणसाने त्याच्या उत्कट प्रार्थनेद्वारे संजीवनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या प्रदेशात पुन्हा पुन्हा संजीवन आणि प्रभूच्या भेटींचा अनुभव न येण्याचे कोणतेही कारण नाही.

हे पुस्तक स्वर्ग उघडल्याबद्दल पवित्र शास्त्र काय प्रकट करते,

याचा अर्थ काय आणि त्याचा परिणाम काय असेल याचा सरळ सोपा अभ्यास आहे. आम्हाला विश्वास आहे की अनेकांना त्यांच्या जीवनावर, त्यांच्या स्थानिक मंडळीवर आणि त्यांच्या समुदायांवर प्रार्थना करण्याद्वारे “उघडा स्वर्ग” निर्माण करण्यासाठी  प्रोत्साहित केले जाईल. आम्हाला विश्वास आहे की एखाद्या प्रदेशातील स्थानिक मंडळ्या त्यांच्या शहरावर किंवा प्रदेशावर उघड्या स्वर्गासाठी, मंडळीच्या सुधारणेसाठी आणि त्या शहराच्या किंवा प्रदेशाच्या परिवर्तनासाठी प्रार्थना करण्यासाठी एकजुट होऊन एकत्र येण्यास प्रेरित होतील.

देव तुम्हास आशीर्वादित करो!

आशीष रायचूर

# 1
# जसे स्वर्गात तसेच पृथ्वीवरही

आपल्याला प्रार्थना करण्यास शिकवताना, प्रभूने आपल्यासमोर ठेल्य वलेल्या मुख्य तत्वांपैकी एक म्हणजे पृथ्वीवर स्वर्ग प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे.

**मत्तय 6:10**
**तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.**

जे स्वर्गात आहे ते येथे पृथ्वीवर स्थापित झाले पाहिजे आणि अनुभवले पाहिजे. हा आमचा अध्यादेश आहे—स्वर्गात जे आहे ते येथे पृथ्वीवर प्रकट होताना पाहणे (मत्तय 16:18,19).

देवाने आधीच त्याच्या लोकांसाठी प्रत्येक आत्मिक आशीर्वाद मोकळा केला आहे. तथापि, स्वर्गीय स्थानातील सर्व काही आम्हाला दिले गेले आहे. अभिषेक, चमत्कार, आरोग्यदान, आपल्याला आवश्यक असलेली तरतूद इत्यादी गोष्टी जे स्वर्गीय स्थानामधील आहेत त्या आपल्याला आधीच देण्यात आल्या आहेत.

**इफिस 1:3**
**आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित *असो.* त्याने *स्वर्गातील* सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे.**

मग आव्हान हे आहे की हे आत्मिक आशीर्वाद आपल्यासाठी पृथ्वीवर प्रकट व्हावेत जसे ते ख्रिस्तामध्ये स्वर्गीय ठिकाणी आपल्याला आधीच दिले गेले आहेत. आमची अशी इच्छा असली पाहिजे की  जे आम्हाला स्वर्गीय स्थानामध्ये आधीच देण्यात आले आहे त्यानुसार

पृथ्वीवरील क्षेत्रात चालणे.

## स्वर्गाच्या राज्यावर आक्रमण करणे

**मत्तय 11:12**
**बाप्तिस्मा करणारा योहान ह्याच्या दिवसांपासून तो आतापर्यंत स्वर्गाच्या राज्यावर आक्रमण होत आहे आणि आक्रमण करणारे ते बळकावत आहेत.**

बापतिस्मा करणारा योहान पृथ्वीवर स्वर्गाच्या राज्याच्या आगमनाचा संदेश घेऊन येणारा पहिला व्यक्ती होता (मत्तय 3:2). स्वर्गाच्या राज्याच्या आगमनाची पृथ्वीवर घोषणा झाल्यापासून, आत्म्यामध्ये जे लोक बलवान आहेत ते—जे स्वतःला पुढे रेटत नेतात—ते राज्यात जे काही आहे बळकावून ते घेतात! आत्म्यामध्ये आक्रमणशीलता असली पाहिजे, आत्म्यामध्ये एक जबरदस्त प्रयत्न की जे काही आम्हाला स्वर्गाच्या राज्यात देण्यात आले आहे ते आम्हास घेता यावे.

आता हे का? देवाने स्वर्गाचे राज्य आपल्यापासून दूर ठेवावे असे होऊ शकत नाही! किंबहुना, त्यालाच पृथ्वीवर मोकळा झालेला स्वर्ग पाहण्याची इच्छा आहे. आम्हाला राज्य देण्यात त्याला आनंद वाटतो (लूक 12:32). आत्मिक जोर-जबरदस्तीची गरज आहे याची मला किमान दोन कारणे दिसतात.

1) आपल्याला माहित आहे की एक शत्रू आहे, सैतान, जो आपल्याला जे काही दिले आहे ते आपल्याला मिळू नये हे पाहण्याचा प्रत्येक प्रयत्न करतो. त्याला येथे पृथ्वीवर स्वर्ग नको आहे, आणि म्हणून आपल्याला तो प्रत्येकप्रकारे अडथळा आणण्याचा प्रयत्न करेल.

2) आत्म्यामध्ये जबरदस्त प्रयत्न करण्याच्या ठिकाणी येणे आपल्याला जे प्राप्त होते त्यामध्ये चालण्यास तयार करते. आम्ही ते प्राप्त करण्यासाठी तयार असणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, आत्म्याच्या वृष्टीच्या (किंवा संजीवनाच्या किंवा भेटीच्या) हंगामात, आपण ज्याला “उघडा स्वर्ग” म्हणतो त्याचा अनुभव घेतो. याचा अर्थ असा की आपण अशा ऋतूत आहोत जेव्हा स्वर्ग पृथ्वीवर आक्रमण करीत आहे—जेव्हा राज्याच्या गोष्टी प्राप्त करणे इतके सोपे होते की, खरे म्हणजे त्याचा आपल्यावर वर्षाव होतो! स्वर्ग उघडा आहे आणि म्हणून, स्वर्गीय क्षेत्रात आपले जे आहे ते घेणे आणि पृथ्वीच्या क्षेत्रात त्यामध्ये चालणे खूप सोपे आहे.

देवाच्या त्याच कार्याचा संदर्भ देण्यासाठी आम्ही “वृष्टी,” आणि “भेट,” “संजीवन” या शब्दांचा उपयोग करू. आणखी स्पष्ट व्हावे म्हणून, “वृष्टी” म्हणजे “एक असा ऋतू जेव्हा आकाश उघडे असते आणि देवाची उपस्थिती पर्जन्यवृष्टीप्रमाणे लोकांवर ओतली जाते.” “भेट” म्हणजे “एक ऋतू जेव्हा देव आपल्यामध्ये चालत असतो—जेव्हा अद्‌त चिन्हे, चमत्कार, अलौकिक भेटी आणि बदललेले जीवन इत्यादी गोष्टी घडून येतात.” “संजीवन” म्हणजे “भरभराट होणे किंवा नव्याने उमलणे, पुन्हा जगणे किंवा पुन्हा जीवन प्राप्त करणे.” जे सुकले होते ते आता फुलू लागते आणि आग पुन्हा पेटते . म्हणून “संजीवन” म्हणजे, “जे पूर्वी स्थापित होते किंवा वैयक्तिक विश्वासणाऱ्यांद्वारे आणि चर्चमध्ये अनुभवले गेले होते ते पुनरुज्जीवित करणे, पुन्हा सक्रिय करणे आणि पुनर्जागृत करणे होय.”

# 2
# उघडा स्वर्ग म्हणजे काय?

“मोकळा, उघडा स्वर्ग” खुला स्वर्ग म्हणजे “आत्म्याच्या वृष्टीचा काळ, परमेश्वराच्या भेटीचा आणि देवाच्या लोकांमध्ये संजीवनाचा हंगाम.” देवाचे लोक आत्मिक आणि भौतिक आशीर्वादांचा वर्षाव अनुभवू लागतात. ही वृष्टी समुदायावर किंवा प्रदेशांवर ”ओतली जाते“ जेणेकरून तारण न पावलेले देखील प्रभावित होतात.

## उघडा स्वर्ग म्हणजे दैवी तरतूद

**अनुवाद 28:12**
**परमेश्वर तुझ्यासाठी आपले उत्तम भांडार म्हणजे आकाश खुले करून तुझ्या भूमीवर योग्य ऋतूत पाऊस पाडील, व तुझ्या हातच्या सर्व कामाला बरकत देईल; तू पुष्कळ राष्ट्रांना उसने देशील पण तुला कोणाकडूनही उसने घ्यावे लागणार नाही.**

**स्तोत्रसंहिता 78:23-25**
**23 तरी त्याने वरती आभाळांस आज्ञा केली, व आकाशद्वारे उघडली.**
**24 खाण्यासाठी त्याने त्यांच्यावर मान्नाचा वर्षाव केला; आणि त्यांना स्वर्गातले धान्य दिले.**
**25 दिव्यदूतांची भाकर मानवांनी खाल्ली; पुरून उरेल इतके अन्न त्याने त्यांना दिले.**

**मलाखी 3:10**
**सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून *जागा पुरणार नाही* एवढ्या *आशीर्वादांचा तुमच्यावर वर्षाव करतो की नाही ह्याविषयी माझी प्रचिती पाहा.***

देवाच्या लोकांच्या जीवनात दैवी तरतूद पाठविण्यासाठी स्वर्गाचे

दरवाजे आणि खिडक्या उघडल्या गेल्याचे पवित्र शास्त्र वर्णन करते. लोकांच्या गरजा अलौकिकपणे पूर्ण केल्या जातात. नोकऱ्या, बढती, आर्थिक उलाढाल, व्यवसायांची वाढ, कर्ज रद्द करणे, जे गमावले ते परत प्राप्त होणे, चुकीच्या पद्धतीने काढून घेतलेले परत करणे आणि देवाच्या लोकांच्या जीवनात भौतिक आशीर्वाद आणण्याच्या बाबतीत बरेच काही घडू लागते. इतर वेळी असे प्रकार घडत नाहीत, असे म्हणता येणार नाही. देव त्याच्या वचनाप्रत खरा आहे आणि तो नेहमी आपल्या गरजा पूर्ण करतो (फिलिप्पैकरांस पत्र 4:19). आणि हो, आपल्या गरजा पूर्ण होण्यासाठी प्रार्थनेची उत्तरे मिळविण्यासाठी आपण नेहमी विश्वासाने चालले पाहिजे (मार्क 11:24). तथापि, उघडलेल्या स्वर्गाच्या हंगामात, देवाच्या लोकांवर भौतिक आशीर्वादांची इतकी वाढ होते की काहीतरी वेगळे घडत आहे हे निर्विवाद आहे.

## मोकळा स्वर्ग म्हणजे देवाच्या आत्म्याचा वर्षाव

**मत्तय 3:16**

**मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लगेच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले, तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणो-वर येताना पाहिला.**

*"आकाश उघडले"* हे देवाच्या आत्म्याच्या वृष्टीच्या संबंधात वापरले जाते. येशू हा पवित्र आत्म्याने अभिषिक्त होता आणि त्याच्याकडे अपरिमित आत्मा होता (लूक 4:17; प्रेषितांची कृत्ये 10:38; योहान 3:34). याचा परिणाम असा झाला की येशूने लोकांची सेवा करत असताना अनेक चमत्कार, चिन्हे आणि अद्‌भुत कृत्ये केली. हे सांगणे सुरक्षित होईल की येशू जेथे कोठे गेला तो उघडलेल्या स्वर्गाखाली गेला. त्याच्यासाठी स्वर्ग नेहमीच खुला होता. तो दैवी भेटीचा काळ होता. देवाने त्याच्या लोकांना भेट दिली होती (लूक 1:68; लूक 7:16).

प्रेषितांची कृत्ये याचे पहिले आठ अध्याय यरूशलेमेवरील

उघडलेल्या स्वर्गाच्या एका अद्‌त हंगामाचे वर्णन करतात ज्याने येशूच्या सेवाकार्याच्या वेळेनंतर लगेचच सुरुवात केली. तो काळ देवाच्या आत्म्याच्या महान वर्षावाचा होता (प्रेषितांची कृत्ये 2:17,18). याचा परिणाम चमत्कार, चिन्हे आणि अद्‌त कृत्यांच्या सामर्थ्यवान प्रात्यक्षिकांमध्ये झाला ज्याने अनेक लोक प्रभूकडे वळले (प्रेषितांची कृत्ये 2:43,47).

## उघडा स्वर्ग म्हणजे देवाच्या नीतिमत्वाचा आणि उपस्थितीचा वर्षाव

**यशया 45:8**

**हे आकाशा, वरून वृष्टी कर; आभाळ नीतिमत्तेचा पाऊस पाडो; पृथ्वी उकलो, तारण आणि नीतिमत्ता ही प्रफुल्लित होवोत; ती एकत्र उगवोत; मी परमेश्वर ह्याचा उत्पन्नकर्ता आहे.**

**होशेय 6:1-3**

**1 "चला, आपण परमेश्वराकडे परत जाऊ; कारण त्याने आम्हांला फाडले आहे, व तोच आम्हांला बरे करील; त्याने आम्हांला जखम केली आहे व तोच पट्टी बांधील.**
**2 तो दोन दिवसांत आमचे पुनरुज्जीवन करील; तिसऱ्या दिवशी तो आम्हांला उठवून उभे करील; आणि त्याच्यासमोर आम्ही जिवंत राहू.**
**3 चला, आपण परमेश्वरास ओळखू; परमेश्वराचे ज्ञान मिळवण्यास झटू; त्याचा उदय अरुणोदयाप्रमाणे निश्चित आहे; तो पर्जन्याप्रमाणे भूमी शिंपणाऱ्या वळवाच्या पर्जन्याप्रमाणे आमच्याकडे येईल."**

उघड्या स्वर्गाच्या हंगामात, नीतिमत्वाची आणि देवाच्या उपस्थितीची वृष्टी होते आणि देव आमच्यावर पावसासारखा उतरून येतो. देवाचे लोक देवाच्या उपस्थितीच्या जाणीवेने आणि ज्ञानाने इतके भारावून जातात की नीतिमत्व, पावित्र्य, शुद्धता, पवित्रीकरण आणि समर्पणाच्या एका नवीन स्तरावर जातात. वैयक्तिक जीवनात पाप सहन होत नाही. ज्या सवयी आणि वागणूक देवाला नापसंत होत्या

आणि ज्यांचा आम्ही एकेकाळी स्वीकार केला होता त्यांचा आता नकार केला गेला आहे आणि त्यांस काढून टाकण्यात आले आहे.

लोकांची अंतःकरणे देवाच्या उपस्थितीचा, नीतिमत्वासाठी त्याच्या पाचारणाचा स्वीकार करण्यासाठी, आणि त्याला, तो जे काही करू इच्छितो त्या सर्व गोष्टीसाठी मोकळी असतात. तेथे एक भूक, एक तहान असते आणि लोक परमेश्वराच्या ज्ञानासाठी पाठपुरावा करू लागतात.

## उघडा स्वर्ग म्हणजे देवदूतांच्या कार्यात वाढ होणे

**योहान 1:51**
**आणखी तो त्याला म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, आकाश उघडलेले आणि देवदूतांना चढताना व मनुष्याच्या पुत्रावर उतरताना तुम्ही पाहाल."**

**उत्पत्ति 28:10-17**
**10 इकडे याकोब बैर-शेबा येथून हारानास जायला निघाला.**
**11 तो एके जागी पोहचला असता सूर्य मावळला म्हणून तेथे रात्र घालवावी ह्या विचाराने तेथला एक धोंडा उशास घेऊन तो त्या ठिकाणी निजला.**
**12 तेव्हा त्याला स्वप्न पडले त्यात त्याने असे पाहिले की एक शिडी पृथ्वीवर उभी केली असून तिचा शेंडा आकाशाला लागला आहे; आणि तिच्यावरून देवदूत चढत-उतरत आहेत.**
**13 आणि पाहा, परमेश्वर तिच्या वरती उभा राहून त्याला म्हणाला, "मी परमेश्वर तुझा पिता अब्राहाम ह्याचा देव व इसहाकाचा देव आहे; ज्या भूमीवर तू निजला आहेस ती मी तुला व तुझ्या संततीला देईन;**
**14 तुझी संतती संख्येने पृथ्वीच्या रजांइतकी होईल, पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चारी दिशांना तुझा विस्तार होईल; तुझ्या व तुझ्या संततीच्या द्वारे पृथ्वीच वरील सर्व कुळे आशीर्वादित होतील.**
**15 पाहा, मी तुझ्याबरोबर आहे; जिकडे-जिकडे तू जाशील त्या सर्व ठिकाणी मी तुझे संरक्षण करीन; आणि तुला ह्या देशात परत आणीन. तुला सांगितले ते करीपर्यंत मी तुला अंतर देणार नाही."**
**16 मग याकोब झोपेतून जागा होऊन म्हणाला, "खरोखर ह्या ठिकाणी परमेश्वर**

**आहे, पण हे मला कळले नव्हते."**
**[17] तो भयभीत होऊन म्हणाला, "हे किती भयप्रद स्थल *आहे!* हे प्रत्यक्ष देवाचे घर, स्वर्गाचे दार *आहे!*"**

देवदूत हे सेवा करणारे आत्मे आहेत जे विश्वासणाऱ्यांच्या सेवेसाठी पाठवले जातात (इब्री 1:14). उघडलेल्या स्वर्गाच्या ऋतुमध्ये, देवदूतांच्या कार्यात  वाढ होते. देवदूतांच्या भेटींत वाढ झाल्याचा अनुभव येतो.

देवाचे लोक या नात्याने आपल्यासाठी देवदूतांची सेवा खूप महत्त्वाची आहे, जरी आपण हा उपदेश फारसा ऐकत नाही. प्रभू येशूची वाळवंटात परीक्षा झाल्यानंतर लगेचच देवदूतांनी त्याची सेवा केली (मत्तय 4:11). गेथसेमाने बागेत, त्याच्या तीव्र दुःखाच्या वेळी, येशूला एका देवदूताने बळ दिले (लूक 22:43). जर स्वतः येशूची अशा प्रकारे सेवा केली जाऊ शकते, तर देवदूतांच्या सेवेद्वारे तुम्हाला आणि मला किती जास्त फायदा होईल!

देवदूतांनी प्रेषितांचीही सेवा केली. एका देवदूताने प्रेषितांना तुरुंगातून बाहेर काढले (प्रेषितांची कृत्ये 5:19). एका देवदूताने फिलिप्पाला गाझा वाळवंटात जाण्यास सांगितले जेथे तो हब्शी षंढास भेटणार होता आणि त्याला ख्रिस्ताविषयी सांगणार होता (प्रेषितांची कृत्ये 8:26). एका देवदूताने पेत्राला तुरुंगातून बाहेर आणले (प्रेषितांची कृत्ये 12:7-11). प्रेषितांच्या पुस्तकात आपण देवदूतांना इतर अनेक गोष्टी करताना पाहतो. एका देवदूताने कर्नेलियसला भेट दिली आणि त्याला पेत्रास बोलावणे पाठवण्याची सूचना दिली (प्रेषितांची कृत्ये 10:3,7,22). याचा परिणाम म्हणून परराष्ट्रीय लोकांत शुभवर्तमानाचा प्रचार घडून आला—प्रारंभीच्या मंडळीच्या दिशेत एक मोठा बदल. एका देवदूताने हेरोदाला असे मारले की तो मरण पावला (प्रेषितांची कृत्ये 12:21-23). एका देवदूताने पौलाला दर्शन दिले आणि जहाज भंग होण्याच्या आधी वादळात त्याच्या आणि

त्याच्यासोबतच्या लोकांच्या सुरक्षिततेची त्याला खात्री दिली (प्रेषितांची कृत्ये 27:23). देवदूत इतर अनेक मार्गांनी आपली सेवा करू शकतात. देवदूत आणि स्वर्गदूत आपले रक्षण करतात (स्तोत्रसंहिता 91:11), स्वप्नात आपल्याशी बोलतात (मत्तय 1:20), आपल्या जीवनात दैवी तरतूद आणतात, अलौकिक आरोग्य घडवून आणतात (योहान 5:4), शारीरिक स्थिती बदलतात (लूक 1:18-20), आमच्या समर्पणात आणि शुद्धीकरणात मदत करतात (यशया 6:6,7), आणखी बरेच काही.

## उघडा स्वर्ग म्हणजे दृष्टान्त, प्रकटीकरणे आणि देवासोबतच्या भेटीत वाढ

**यहेज्केल 1:1**
**मी खबार नदीच्या तीरी पकडून आणलेल्या लोकांत राहत होतो, तेव्हा तिसाव्या वर्षाच्या चौथ्या *मासी* पंचमीस असे झाले *की* आकाश दुभागून मला दिव्य दृष्टान्त दिसले**

**प्रेषितांची कृत्ये 7:55,56**
**55 परंतु पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्याने आकाशाकडे निरखून पाहिले तेव्हा देवाचे तेज व देवाच्या उजवीकडे येशू उभा असलेला त्याच्या दृष्टीस पडला;**
**56 आणि त्याने म्हटले, "पाहा, आकाश उघडलेले व मनुष्याचा पुत्र देवाच्या उजवीकडे उभा असलेला मला दिसत आहे."**

**प्रेषितांची कृत्ये 10:9-17**
**9 ते दुसऱ्या दिवशी वाटेवर असता गावाजवळ येताना दोन प्रहराच्या सुमारास पेत्र प्रार्थना करण्यास धाब्यावर गेला.**
**10 तेव्हा त्याला भूक लागून काही खावेसे वाटले; आणि जेवणाची तयारी होत आहे इतक्यात त्याचे देहभान सुटले.**
**11 तेव्हा आकाश उघडलेले व मोठ्या चांदव्यासारखे चार कोपरे धरून सोडलेले एक पात्र पृथ्वीवर उतरत आहे असा दृष्टान्त त्याला झाला.**
**12 त्यात पृथ्वीवरील सर्व चतुष्पाद प्राणी, सरपटणारे जीव व आकाशातील पाखरे होती.**
**13 मग त्याने अशी वाणी ऐकली की, 'पेत्रा, ऊठ; मारून खा.'**
**14 पेत्र म्हणाला, "नको, नको, प्रभू; कारण निषिद्ध आणि अशुद्ध असे काही मी**

**कधीही खाल्ले नाही."**
**15 मग दुसर्यांदा अशी वाणी झाली की, "देवाने जे शुद्ध केले आहे ते तू निषिद्ध**
**मानू नकोस."**
**16 असे तीन वेळा झाले आणि लगेच ते पात्र आकाशात वर घेतले गेले.**
**17 आपण पाहिलेल्या दृष्टान्ताचा अर्थ काय असावा ह्याविषयी पेत्र विचारात**
**पडला असता, पाहा, कर्नेल्याने पाठवलेली माणसे शिमोनाचे घर शोधल्यावर**
**दरवाजाजवळ येऊन उभी राहिली.**

**प्रकटीकरण 4:1,2**
**1 ह्यानंतर मी पाहिले तो पाहा, स्वर्गात एक दार *उघडलेले* मला दिसले आणि**
**जी वाणी मी प्रथम ऐकली होती ती माझ्याबरोबर बोलणाऱ्या 'कर्ण्याच्या'**
**ध्वनीसारखी *होती*; ती म्हणाली, "इकडे 'वर ये' म्हणजे 'ज्या गोष्टी' ह्यानंतर**
**'घडून आल्या पाहिजेत' त्या मी तुला दाखवीन."**
**2 लगेचच मी आत्म्याने संचरित झालो, तेव्हा पाहा, स्वर्गात राजासन मांडलेले**
**होते, आणि 'त्या राजासनावर *कोणीएक* बसलेला होता.'**

**प्रकटीकरण 19:11**
**नंतर मी स्वर्ग उघडलेला पाहिला', तो पाहा, एक पांढरा घोडा आणि विश्वसनीय व सत्य असा म्हटलेला एक स्वार त्याच्यावर बसलेला मला दिसला. 'तो नीतीने न्यायनिवाडा करतो' व लढतो.**

कित्येक ठिकाणी, बायबल आपल्याला दाखवून देते की जेव्हा स्वर्ग उघडला गेला तेव्हा पृथ्वीवरील लोकांनी दृष्टान्त, प्रकटीकरणे आणि देवासोबतच्या भेटीचा  अनुभव घेतला. पौलाने तिसऱ्या स्वर्गात, सुखलोकात नेण्यात येण्याविषयी सांगितले आणि त्याने अशा गोष्टी ऐकल्या ज्या सांगण्याची मनाई होती (2 करिंथ 12:1-4). आत्म्याच्या वर्षावाच्या आणि भेटीच्या हंगामात, जेव्हा लोक उघड्या स्वर्गाखाली असतात, तेव्हा देवाच्या लोकांमध्ये दृष्टान्त, स्वप्ने आणि प्रकटीकरणांमध्ये वाढ होते. ज्यांना सामान्यतः दृष्टान्त आणि प्रकटीकरण प्राप्त झाले नाही त्यांनाही असे अनुभव येऊ लागतात. अनेकांना ज्ञानाचे वचन, विद्येचे वचन आणि आत्मे ओळखण्याच्या कृपादानांत कार्य करणे सोपे होते. काही प्रकटीकरणे जीवन बदलणारी, भविष्य बदलणारी, नवीन

सेवा सुरू करणारी इत्यादी असू शकतात.

## उघडा स्वर्ग म्हणजे प्रार्थनेचे उत्तर मिळणे होय

**2 इतिहास 30:26,27**

**26 यरुशलेमेत फार आनंद झाला; इस्राएलाचा राजा दावीदपुत्र शलमोन ह्याच्या वेळेपासून असा उत्सव यरुशलेमेत *कधी झाला नव्हता.***

**27 मग लेवीय याजकांनी उभे राहून लोकांना आशीर्वाद दिले; त्यांची वाणी देवाने ऐकली, आणि त्यांची प्रार्थना देवाच्या पवित्र निवासापर्यंत, स्वर्गा *पर्यंत* जाऊन पोहचली.**

आम्हाला माहीत आहे की देव नेहमी प्रार्थना ऐकतो आणि त्याचे उत्तर देतो. परंतु खुल्या स्वर्गाच्या हंगामात, जसे हिज्कियाच्या शासनकाळातील इस्राएलमधील संजीवनाच्या काळात अनुभव आले, प्रार्थनेची उत्तरे सहज आणि त्वरित मिळतात. हे दानीएलाने जे अनुभव केले होते त्याच्या अगदी विपरीत आहे—त्याला स्वर्गातून उत्तर मिळविण्यासाठी 21 दिवस आग्रहाची प्रार्थना करावी लागली आणि वाट पहावी लागली (दानीएल 10:1-13). उत्तर मिळण्यासाठी दुरात्म्यांचे जे अडथळे असतात ते कमी होतात आणि स्वर्गदूत महान उत्तरे त्वरित घेऊन येतात.

# 3
# स्वर्ग कशामुळे उघडला जातो?

आमच्या शहरावर, समाजावर, किंवा प्रदेशावर उघडा स्वर्ग पाहण्याश साठी आम्ही काही करू शकतो का? असे असेल तर, ते काय असेल?

हे खरे आहे की, असे काही प्रसंग आहेत जेव्हां देव आपल्या सार्वभौमत्वात आकाश विदारून अशा वेळी उतरून येतो जेव्हा कोणालाही अपेक्षा नसते, पवित्रशास्त्र आणि इतिहास दोन्ही आम्हाला अनेक गोष्टी शिकवितात जे देवाचे लोक खुला स्वर्ग पाहण्यासाठी करू शकतात.

## देवाचा आग्रहपूर्ण पाठपुरावा

**होशेय 6:1-3**

**1"चला, आपण परमेश्वराकडे परत जाऊ; कारण त्याने आम्हांला फाडले आहे, व तोच आम्हांला बरे करील; त्याने आम्हांला जखम केली आहे व तोच पट्टी बांधील.**
**2 तो दोन दिवसांत आमचे पुनरुज्जीवन करील; तिसऱ्या दिवशी तो आम्हांला उठवून उभे करील; आणि त्याच्यासमोर आम्ही जिवंत राहू.**
**3 चला, आपण परमेश्वरास ओळखू; परमेश्वराचे ज्ञान मिळवण्यास झटू; त्याचा उदय अरुणोदयाप्रमाणे निश्चित आहे; तो पर्जन्याप्रमाणे भूमी शिंपणाऱ्या वळवाच्या पर्जन्याप्रमाणे आमच्याकडे येईल."**

जर आपण, देवाचे लोक, देवाकडे परत फिरून प्रभूचा पाठपुरावा करू लागू, तर बायबल आपल्याला खात्री देते की तो पावसाच्या वृष्टीसारखा आपल्याकडे येईल. आपल्यावर देवाच्या उपस्थितीचा आणि सामर्थ्याचा वर्षाव होईल.

जेव्हा आम्ही देवाचा आग्रहपूर्वक पाठपुरावा करू लागतो, तेव्हा तीव्र भूक, पश्चात्ताप, स्वतःला देवाकरिता वेगळे करणे, देवाप्रत समर्पण, आणि दीर्घकाळपर्यंत त्याचा शोध घेणे याद्वारे ते व्यक्त होते. पाण्याच्या प्रवाहासाठी तहानलेल्या हरणाप्रमाणे आपली अंतःकरणे देवासाठी अधिक तान्हेली असावीत (स्तोत्रसंहिता 42:1,2). इतिहास अशा व्यक्तींच्या आणि विश्वासणाऱ्यांच्या गटांच्या सामर्थ्यवान साक्षींनी भरलेला आहे ज्यांनी प्रार्थना, स्तुती आणि उपासनेद्वारे देवाचा मनापासून शोध घेतला आणि प्रभूच्या सान्निध्यात राहून, प्रभूच्या सामर्थ्यवान भेटीचा अनुभव घेतला. कोणत्याही प्रदेशातील मंडळी हे हेतुपुरस्सर का करू शकत नाही आणि देवाचे दर्शन का घेऊ शकत नाही याचे कुठलेही कारण नाही. शेवटी, देवाचा पाठपुरावा करणे आणि त्याच्या उपस्थितीचा शोध घेणे ही आपली निवड आहे. आणि देवाने वचन दिलेले आहे की जेव्हा आपण धावा करू तेव्हा तो आपल्याजवळ **येईल**! जेव्हा आपण त्याच्याजवळ जाऊ तेव्हा तो आपल्याजवळ **येईल** (याकोब 4:8).

चार्ल्स फिनी यांनी म्हटले आहे, “जेव्हा वीर, आत्मे जिंकण्यासाठी किंवा मरण्यासाठी तेव्हा—अथवा गरज पडल्यास, जिंकण्यासाठी आणि मरण्यासाठी निर्धार करून लढ्यात प्रवेश करतात! तेंव्हा ‘स्वर्गाच्या राज्यावर आक्रमण होते आणि आक्रमण करणारे ते बळकावतात.’”

## देवाच्या लोकांमध्ये ऐक्य

**स्तोत्रसंहिता 133:1-3**

**1 पाहा, बंधूंनी ऐक्याने एकत्र राहणे किती चांगले व मनोरम *आहे!***

**2 ते मस्तकावर ओतलेल्या, अहरोनाच्या दाढीवर उतरलेल्या, त्याच्या वस्त्राच्या काठापर्यंत ओघळलेल्या बहुमोल तेलासारखे *आहे;***

**3 सीयोन डोंगरावर उतरणाऱ्या हर्मोन पर्वताच्या दहिवरासारखे ते आहे; कारण तेथे परमेश्वराने आशीर्वाद म्हणजे अनंतकालिक जीवन देण्याचे ठरवले *आहे.***

आत्म्याच्या वर्षावापूर्वी एक असे वातावरण तयार होते जेथे त्या प्रदेशातील देवाच्या लोकांमध्ये खरी एकता घडून येते. आम्हाला स्वार्थी महत्त्वाकांक्षा, संशय आणि स्पर्धा दूर करण्याची गरज आहे. स्वार्थी महत्त्वाकांक्षा संशयाला जन्म देते, संशयामुळे स्पर्धेची दारे उघडतात आणि स्पर्धेमुळे विभाजन होते.

जेव्हा देवाचे लोक नाव, संप्रदाय, सैद्धांतिक भिन्नता यांचा विचार न करता एकात्मतेने, क्षुल्लक कलह बाजूला ठेवून केवळ देवाचा शोध घेण्याच्या एका उद्देशाने एकत्र येतात, तेव्हा त्याच्या आत्म्याच्या उपस्थितीचा आणि सामर्थ्याचा मोठा वर्षाव होईल. त्यांच्या डोक्यापासून पायापर्यंत, मोठ्यापासून लहानापर्यंत सर्वांवर अभिषेक, नवीनीकरण, आशीर्वाद आणि जीवनाचा वर्षाव होईल!

हे 120 शिष्यांच्या बाबतीत खरे होते. बायबल आपल्याला सांगते की पवित्र आत्म्याचे अभिवचन प्राप्त झाल्यावर (प्रेषितांची कृत्ये 1:5,8), ते *"एकचित्ताने प्रार्थना करण्यात तत्पर असत"* (प्रेषितांची कृत्ये 1:14अ). एकचित्त होऊन प्रार्थना करीत असल्यामुळे, ते आत्म्याचा वर्षाव प्राप्त करण्याच्या स्थितीत होते!

देवाकरिता जर आपल्या शहरामध्ये असे लोक असतील—पाळक, उपदेशक, देवाचे सेवक आणि विश्वासणारे—जे वैयक्तिक कार्यक्रम बाजूला ठेवून उघडा स्वर्ग, देवाची भेट, आणि आत्म्याची वृष्टी, व संजीवन यासाठी देवाचा शोध घेण्यासाठी एकत्र येण्यास तयार होतील, तर शहरातील प्रत्येक मंडळीवर परिणाम घडवून आणतील! असे राज्याची मानसिकता बाळगणारे, ख्रिस्तासमान आणि लोकांवर प्रीती करणारे पुढारी कोठे आहेत? कोठे आहेत ते विश्वासणारे जे सांप्रदायिक कोठडीतून बाहेर पडतील, जे मंडळीच्या नावावरील फूट पाडणारी निष्ठा सोडून देतील आणि राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू याच्याप्रत, तसेच त्याच्या राज्यावर आणि त्याच्या मंडळीवर निष्ठा

प्रदर्शित करतील? आपल्या शहरावरील उघड्या स्वर्गासाठी आपण देवाचा शोध घेण्यासाठी एकत्र येऊ शकतो का?

## आग्रहाची प्रार्थना

**याकोब 5:16-18**
**16"... नीतिमानाची आग्रही प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते.**
**17 एलीया आपल्यासारख्या स्वभावाचा माणूस होता; त्याने पाऊस पडू नये अशी आग्रहाने प्रार्थना केली, आणि साडेतीन वर्षे पृथ्वीवर पाऊस पडला नाही.**
**18 पुन्हा त्याने प्रार्थना केली; तेव्हा आकाशाने पाऊस पाडला, आणि भूमीने आपले फळ उपजवले.**

देव त्याच्या लोकांच्या उत्कट प्रार्थनांना प्रतिसाद देतो. आमच्याजवळ एलीयाचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे ज्याने नैसर्गिक पावसासाठी प्रार्थना केली आणि ते घडतांना पाहिले (1 राजे 18:41-46). विपुल पर्जन्यवृष्टीचा ध्वनी होत असल्याची घोषणा त्याने केली आणि त्यानंतर तो प्रार्थना करू लागला. त्याने प्रार्थनेत किती वेळ घालविला याचा आपल्याला काही संकेत नाही. प्रार्थनेच्या उत्तराची चिन्हे दिसण्यासाठी त्याने सहा वेळा पाहिले पण तेथे काहीच नव्हते! तथापि, त्याने प्रार्थना करणे सोडले नाही. तो सातव्यांदा पुढे गेला आणि त्याला पर्जन्यवृष्टी होणार असल्याचे एक लहानसे चिन्ह दिसले. आणि नक्कीच, पाऊस आला! ही अशी प्रार्थना आहे जी आपल्याला आकाश उघडे पाहण्यासाठी आवश्यक आहे. स्वर्ग उघडण्याची चिन्हे दिसत नसतानाही हताश न होणारी प्रार्थना. कळकळीची प्रार्थना! आग्रहाची प्रार्थना! चिकाटीची प्रार्थना! पाऊस पडेपर्यंत प्रार्थना करणे न सोडणारी प्रार्थना!

येथे पवित्रशास्त्रातून आणखी परिच्छेद आहेत जे आपल्याला उघडलेल्या स्वर्गासाठी प्रार्थना करण्यास प्रोत्साहन देतात:

**2 इतिहास 7:13,14**
**13 पर्जन्यवृष्टी होऊ नये म्हणून मी जर आकाशकपाटे बंद केली, किंवा जमिनीचा**

**उपज फस्त करण्यासाठी टोळधाड पाठवली, किंवा आपल्या लोकांमध्ये मरी पाठवली,**
**14 तर माझे नाम ज्यांना दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गांपासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापांची त्यांना क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन.**

**स्तोत्रसंहिता 80:14,15**
**14 हे सेनाधीश देवा, तू मागे फीर असे आम्ही तुला विनवतो. स्वर्गातून दृष्टी लावून पाहा व ह्या द्राक्षवेलाचे संगोपन कर;**
**15 जे रोप तू आपल्या उजव्या हाताने लावले, *जी* शाखा तू स्वतःसाठी मजबूत केली तिचे संगोपन कर.**

**स्तोत्रसंहिता 144:5**
**हे परमेश्वरा, तू आपले आकाश लववून खाली उतर; पर्वतांना स्पर्श कर म्हणजे ते धुमसतील.**

**यशया 64:1-4**
**1 अहाहा! तू आकाश विदारून उतरतास, तुझ्या दर्शनाने पर्वत कंपायमान झाले असते, तर बरे होते!**
**2 अग्नी जसा काड्याकुड्या जाळतो व पाणी उकळवतो तसा तू आपल्या शत्रूंना आपले नाम प्रकट करण्यासाठी उतरला असतास;**
**3 तू अनपेक्षित भयप्रद कृत्ये करीत असता तुझ्या दर्शनाने राष्ट्रे थरथर कापली असती तर बरे होते!**
**4 हे देवा, तुझी आशा धरून राहणाऱ्यांचे इष्ट काम करणारा असा तुझ्याशिवाय दुसरा कोणी प्राचीन कालापासून ऐकण्यात आलेला नाही, त्याचे नाव आलेले नाही, कोणी तो डोळ्यांनी पाहिला नाही.**

**जखऱ्या 10:1**
**वीज उत्पन्न करणाऱ्या परमेश्वराजवळ वळवाच्या पावसाच्या वेळी पाऊस मागा म्हणजे तो त्यांच्यावर वृष्टी करील; तो प्रत्येकाच्या शेतात गवत उपजवील.**

## अपेक्षा आणि विश्वास

आपण देवाची उपस्थिती आणि सामर्थ्य प्रकट होण्यासाठी एकत्र देवाचा पाठपुरावा आणि प्रार्थना करत असताना उच्च विश्वासाची जाणीव व अपेक्षा असणे आवश्यक आहे. आपण त्या शेतकऱ्या सारखे आहोत जो पावसाची पूर्ण अपेक्षा ठेवून नांगरणी करतो व आपले बी पेरतो. आपण त्याच्या उपस्थितीचा आणि सामर्थ्याचा प्रत्येक थेंब आणि रिमझिम पाऊस साजरा केला पाहिजे जो आपण पाहू लागतो. त्याच्या उपस्थितीचा प्रत्येक अनुभव, प्रत्येक आरोग्यदान, ते कितीही लहान असले तरीही, आपल्याला आनंद करण्यासाठी पुरेसे असायला हवे कारण हे या गोष्टीचा संकेत आहे की विपुल पर्जन्यवृष्टी येत आहे!

## आमच्या अधिकाराचा वापर

**मत्तय 16:18,19**

**18 आणखी मी तुला सांगतो, तू पेत्र आहेस आणि ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वारांचे काहीच चालणार नाही.**

**19 मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन आणि पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल व पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल."**

आम्हाला पृथ्वीवर स्वर्ग मोकळा करण्याचा अधिकार सोपविण्यात आला आहे. देवाने स्वर्गात जे बांधल्याचे घोषित केले आहे ते आम्ही पृथ्वीवर बांधतो. ज्याची स्वर्गात परवानगी देण्यात आली आहे, ते आम्ही पृथ्वीवर मोकळे करतो. स्वर्ग आपल्यावर ज्याची वृष्टी करू इच्छितो त्यास अडथळा आणण्यास जे काही कारणीभूत ठरते ते बांधण्यासाठी आपण आपला आत्मिक अधिकार वापरला पाहिजे. कलह आणि विभाजनाचे दुरात्मे, आपल्या प्रदेशातील  दुरात्म्यांचा प्रभाव आपणास परमेश्वराने दिलेल्या अधिकाराच्या उपयोगाने आपल्या मार्गातून काढून टाकला पाहिजे.

## हंगामाचा शेवट का होतो

जरी देवाचे प्रत्येक संजीवन किंवा वृष्टी अद्वितीय आहे, तरीही देवाचे सार्वभौम कार्य प्राप्त करणे आणि टिकवून ठेवणे यात साम्य आहे. जेव्हा अग्नी एखाद्या चर्च किंवा गटावर उतरतो, तेंव्हा देव अपेक्षेने त्याच्या लोकांच्या प्रतिसादाकडे पाहत असतो. जेव्हा लोक इतर विषय आणि कार्यक्रम बाजूला ठेवून ख्रिस्तास आणि त्याच्या संजीवनाच्या कार्यास त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू बनवून प्रतिसाद देतात आणि तसे करत राहतात, तेव्हा आत्म्याचा वर्षाव चालू राहतो आणि देवाचे संजीवन त्याच्या उपस्थितीचे निवासस्थान बनते. अग्नीच्या वृष्टीच्या वेळी आमची संपूर्ण हतबलता आम्हाला आमचे कॅलेंडर रिकामे करून आणि आमचे जीवन त्याच्यावर केंद्रित करून बाहेर पडण्यास योग्य प्रतिसाद देण्यासाठी तयार करेल.

ज्याप्रकारे आम्ही जगतो, ज्याप्रकारे आम्ही विचार करतो, आणि ज्याप्रकारे आम्ही मंडळीचे संचालन करतो, त्यात संजीवन पूर्ण बदल घडवून आणते. बहुतेक लोक अद्याप त्यांच्या अंतःकरणात आणि मनात खोलवर, अशा आमूलाग्र बदलासाठी तयार नाहीत.

वृष्टी होते आणि फक्त हंगामापुरतीच ती राहते याचे कारण मुळात समान आहे. ते कायमस्वरूपी न राहण्याचे कारण म्हणजे लोक किंवा पुढारी या जीवनातील गोष्टींची पुन्हा काळजी करू लागतात. नैसर्गिक गोष्टींसाठी दबाव आणि इच्छा देवाच्या कार्यासाठी त्यांच्या जीवनात जागाच राहू देत नाही आणि ते पुढे चालू राहणार नाही. आमचा उत्साह आणि त्याची उपस्थिती आमच्या कमी होत चाललेल्या रूचीमुळे आणि आपल्या जीवनात आणि चर्चमध्ये देवाचे कार्य सुरू राहावे म्हणून जागा बनवण्याची इच्छा नाहीशी व्हावी ही देवाची योजना नाही. आणखी काही चांगले करायचे असेल तर आपल्या जीवनात आणि चर्चमध्ये देवाचे कार्य सुरू राहावे म्हणून आमच्याजवळ जागा बनवण्याची

इच्छा नसेल तर संजीवन येणार नाही आणि टिकून राहणार नाही. संजीवन येणार नाही व ते टिकूनही राहणार नाही. जेव्हा आपण आपले कॅलेंडर रिकामे करतो, आपले जीवन रिकामे करतो आणि रिकामे पात्र बनतो तेव्हाच आपण परमेश्वराच्या आत्म्याच्या वृष्टीचा अनुभव घेऊ शकतो. आणि जर आपण इतर गोष्टी करू लागलो, तर आपण देवाच्या वृष्टीमध्ये टिकून राहणार नाही. आणि सेवाकार्याच्या चांगल्या गोष्टी देखील आपल्या जीवनात संजीवन आणणाऱ्या आत्म्याचा वर्षाव रोखू शकतात.

(*आय सॉ स्मिथटन आऊटपोअरिंग,* रॉन मॅक्गॉटलिन, 2002 मधून रूपांतरित)

**तो येईपर्यंत आणि आमच्यावर, आमच्या मंडळीवर, शहरातील मंडळीवर आणि शहरावर पर्जन्यवृष्टी, आत्म्याचा वर्षाव आणेपर्यंत त्याला शोधू या.**

**त्याचा आणि त्याच्या उपस्थितीचा अधिक अनुभव घेण्यासाठी आपण किंमत मोजणार का?**

# 4
# तुमच्या प्रदेशावर स्वर्ग उघडा आहे का?

जनसंख्येचा विस्फोट होत असलेल्या आमच्या शहरांवर आणि प्रदेशांवर आम्ही कसा परिणाम घडवून आणणार आहोत? एकटी मंडळी हे करू शकत नाही. कोणताही एक सुवार्तिक, कोणताही सुवार्ता कार्यक्रम आमच्या अशा शहरात सुवार्ता घेऊन पोहोचू शकत नाही जेथे लक्षावधी लोक आहेत. आपल्याला गरज आहे ती पूर्ण विकसित संजीवनाची, देवाच्या उपस्थितीची व सामर्थ्याच्या एका जबरदस्त वृष्टीची जी बराच काळ टिकून राहील, जो पर्यंत आपल्या शहरातील प्रत्येक भाग कायमस्वरूपी प्रभावित होणार नाही. शहराच्या रूपांतरासाठी संजीवन अती आवश्यक आहे.

संजीवनाचे एक प्राथमिक उद्दिष्ट्य म्हणजे हरवलेल्या आत्म्यांचे तारण व समाजाचे आणि शहरांचे रूपांतर. संजीवन हा उघड्या स्वर्गाचा दैवी हंगाम आहे जेथे देवाचे राज्य सामर्थ्याने उसळून येते ज्यामुळे आरोग्यदान, सुटका आणि बहुसंख्येचे तारण होते. देव संजीवन पाठवतो जेणेकरून आपण आपले चमत्कार प्राप्त करून घ्यावेत, गौरवाने भरून जावे, जे आपल्या समाजात घेऊन जाता येईल आणि आपण शहराच्या परिवर्तनासाठी मंडळीत सुधारणा घडून येतांना पाहू.

आपल्या शहरावर एक उघडा स्वर्ग निर्माण करण्यासाठी आपण एकत्र यावे म्हणून हे पाचारण आहे. उघड्या स्वर्गासाठी देवाचा धावा करण्यासाठी तुम्ही तुमची भूमिका पार पाडाल का? प्रचंड अग्नी प्रज्वलित व्हावा म्हणून फक्त एक ठिणगी लागते. शहरात उलथापालथ

घडवून आणू शकेल अशी योजना तयार करण्यासाठी फक्त मूठभर लोकांची गरज आहे (माडीवरील खोलीतील 120 लोक आठवा).

**स्तोत्रसंहिता 18:9**
**आकाश लववून तो खाली उतरला; त्याच्या पायांखाली निबिड अंधकार होता.**

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखववायास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

लोक, समुदाय आणि भौगोलिक प्रदेशांवर स्वर्ग उघडल्याबद्दल ख्रिस्ताच्या मंडळीस नवीन समज आणि अंतर्दृष्टी प्राप्त होत आहे. असे दिसते की जगात असे काही प्रदेश आहेत, जसे वेल्स, फ्लोरिडा, आणि भारतातील शिलाँग, जे उघडलेल्या स्वर्गासाठी "संवेदनशील ठिकाणे" आहेत.

हे पुस्तक स्वर्ग उघडल्याबद्दल पवित्र शास्त्र काय प्रकट करते, याचा अर्थ काय आणि त्याचा परिणाम काय असेल याचा सरळ सोपा अभ्यास आहे. आम्हाला विश्वास आहे की अनेकांना त्यांच्या जीवनावर, त्यांच्या स्थानिक मंडळीवर आणि त्यांच्या समुदायांवर प्रार्थना करण्याद्वारे "उघडा स्वर्ग" निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. आम्हाला विश्वास आहे की एखाद्या प्रदेशातील स्थानिक मंडळ्या त्यांच्या शहरावर किंवा प्रदेशावर उघड्या स्वर्गासाठी, मंडळीच्या सुधारणेसाठी आणि त्या शहराच्या किंवा प्रदेशाच्या परिवर्तनासाठी प्रार्थना करण्यासाठी एकजुट होऊन एकत्र येण्यास प्रेरित होतील.


All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org